**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सेशेल्सच्या तीन दिवसाच्या दौऱ्यासाठी रवाना

- पेपरफुटीमुळे शिक्षक पात्रता परीक्षा पुढे ढकलली

- संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेचं सामर्थ्य सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग क्षेत्रावर अवलंबून असल्याचं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांचं प्रतिपादन

- भारत टॅक्सी सेवेचा प्रारंभ गुजरातमधल्या १४ शहरांमधे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत आज होणार

- कोलकाता इथं इमारत कोसळल्यामुळे झालेल्या अपघातात मृतांची संख्या १७ वर

**आणि**

- टी ट्वेंटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताचा आयर्लंडकडून ३४ धावांनी पराभव

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सकाळी सेशेल्सच्या तीन दिवसीय दौऱ्यासाठी रवाना झाले. आपल्या या भेटीत प्रधानमंत्री मोदी सेशेल्सच्या राष्ट्रीय दिनाच्या सुवर्णमहोत्सवी सोहळ्याचे मुख्य अतिथी म्हणून सहभागी होणार आहेत. या दौऱ्यात प्रधानमंत्री मोदी सेशेल्सच्या राष्ट्रीय सभेला संबोधित करतील, असा बहुमान मिळणारे ते पहिले भारतीय प्रधानमंत्री असणार आहेत. या घडामोडींमधून दोन्ही देशांना जोडणारी भक्कम लोकशाही मूल्यं आणि संसदीय परंपरेचं दर्शन घडतं असं प्रधानमंत्र्यांनी या दौऱ्यासाठी रवाना होण्यापूर्वी जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. दोन्ही देशांमधली मैत्री अधिक दृढ करण्यासाठी तसंच हिंद महासागर क्षेत्रातल्या लोकांची प्रगती आणि समृद्धीसाठी, आपण सेशेल्सचे राष्ट्रपती डॉ. पॅट्रिक हर्मिनी यांच्यासोबत चर्चा करायला उत्सुक आहोत, असंही प्रधानमंत्र्यांनी या निवेदनात म्हटलं आहे. सेशेल्स हा भारतालगतच्या सागरी प्रदेशातला एक महत्वाचा शेजारी देश आहे, तसंच भारताचा महासागर हा उपक्रम आणि ग्लोबल साऊथअंतर्गतच्या देशांप्रती असलेल्या वचनबद्धतेतला तो एक महत्त्वाचा भागीदार देश आहे, असंही प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

या दौऱ्यात प्रधानमंत्री सेशेल्समधल्या भारतीय समुदायाशी देखील संवाद साधतील. आपल्या या दौऱ्यामुळं दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध आणखी दृढ होतील, हिंद महासागर क्षेत्रातल्या सागरी सहकार्याचा विस्तार होईल, तसंच सुरक्षित, शांततापूर्ण आणि समृद्ध क्षेत्रासाठीच्या परस्पर सामायिक संकल्पाला पुढची दिशा देण्यात मदत होईल असा विश्वासही प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत भारताला स्थायी सदस्यत्व मिळवं या भारताच्या मागणीला सेशेल्सनं पाठिंबा दर्शवला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सेशेल्श दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सेशेल्सचे परराष्ट्र मंत्री बॅरी फॉरे यांनी ही घोषणा केली.

**<><><><><>**

संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेचं सामर्थ्य एमएसएमई अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाच्या योगदानावर अवलंबून आहे, असं मत उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी व्यक्त केलं. एमएसएमई दिनानिमित्त नवी दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. एमएसएमई क्षेत्र देशातल्या नवउद्योजकांच्या पहिल्या पिढीच्या धाडसाचं प्रतिनिधित्व करत असल्याचं त्यांनी सांगितलं. हे क्षेत्राची उत्पादनं उच्च गुणवत्ता बाळगत देशाच्या एकूण निर्यातीत सुमारे ५० टक्के योगदान देतं, असंही ते म्हणाले. उत्पादन आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी नवउद्योजकांनी नव्या तंत्रज्ञानाचा अवलम्ब करावा, असं आवाहन त्यांनी केलं.

**<><><><><>**

गुजरातमधल्या १४ शहरांमधे भारत टॅक्सी या सहकार तत्वावर आधारित टॅक्सी सेवेचा प्रारंभ गांधीनगर इथे आज होणाऱ्या समारंभात केंद्रीय सहकार आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत होणार आहे. गुजरातचे मुख्यमंत्री भुपेंद्र पटेल, उपमुख्यमंत्री हर्ष संघवी या कार्यक्रमाला उपस्थित असतील. भारत टॅक्सी सेवा सहकार टॅक्सी को ऑपरेटिव लिमिटेड मार्फत चालवली जाणार असून अमूल, इफ्को, नाबार्ड सारख्या संस्थांनी याला सहकार्य केलं आहे. चालकापर्यंत थेट लाभ पोहोचवण्यावर या मॉडेलचा भर असेल. चालकांचं शोषण थांबवणं हे याचं उद्दिष्ट असल्याचं शहा यांनी सांगितलं.

- **- होल्ड बाईट शहा - -**

गेल्यावर्षी डिसेंबरमधे या सेवेचं सॉफ्ट लॉन्च झाल्यावर भारत टॅक्सीसाठी दीड लाखापेक्षा जास्त चालक आणि सात लाख ग्राहकांनी नोंदणी केली आहे. तसंच भारत टॅक्सीच्या दररोज साडे तीन हजार फेऱ्या होतात. अहमदाबाद, सुरत आणि वडोदरासह १४ शहरात ही सेवा आजपासून सुरू होत असून महिनाभरात संपूर्ण गुजरातमधे सेवा सुरू होईल.

**<><><><><>**

राज्यभरात उद्या होणारी शिक्षक पात्रतेसाठीची टीईटी परीक्षा पेपरफुटीमुळे पुढे ढकलण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेनं आज ही माहिती दिली. भिवंडी इथल्या काही जणांकडे या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेबद्दल माहिती असल्याची माहिती मिळाल्याने भिवंडी पोलिसांनी या ठिकाणी धाड टाकली. याप्रकरणी भिवंडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**<><><><><>**

नवी दिल्ली इथं येत्या २९ जूनला 'केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण परिषदे'चं १६ वं अधिवेशन होत असून केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे. पी. नड्डा अधिवेशनाचं अध्यक्षपद भूषवणार आहेत. विविध राज्यं, केंद्रशासित प्रदेशांचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री, संसद सदस्य तसंच केंद्र आणि राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी या अधिवेशनात सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

इस्त्रायल गाझामध्ये करत असलेल्या नरसंहारावरच्या मुद्यावर केंद्र सरकारचं मौन आणि निष्क्रियता नैतिकदृष्ट्या निषेधार्ह असून, सरकारची ही भूमिका राष्ट्रीय हिताच्या दृष्टीकोनातूनं न पटणारी असल्याचं काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी यांनी एका वृत्तपत्रात लिहिलेल्या लेखात म्हटलं आहे. भारतानं पॅलेस्टाईन, इराण आणि संपूर्ण मध्य पूर्वेतल्या आपल्या ऐतिहासिक मित्रदेशांपासून अंतर राखलं आहे, या सोबतच जागतिक पातळीवरच्या जनमतापासूनही स्वतःला वेगळं ठेवलं आहे, यामुळेच पाकिस्तानला मध्यस्थ म्हणून दावा करण्याची संधी मिळाली, असा आरोपही त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरुन मन की बातच्या १३५व्या भागातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. आकाशवाणी, दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, यूट्यूब वाहिन्या, तसंच न्यूज ऑन एआरआर ॲपवरून मन की बात ऐकता येणार आहे.

<><><><><>

कोलकाता इथल्या तारातालाभागात इमारत कोसळल्यामुळे झालेल्या अपघातातल्या मृत्यूंची संख्या सतरा वर पोहचली आहे. या घटनेतल्या जखमींवर कोलकात्याच्या एसएसकेएम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळी मदत आणि बचाव कार्य अजूनही सुरु आहे. भारतीय लष्कर, राष्ट्रीय आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दलासह इतर यंत्रणा समन्वनानं बचाव आणि मदत कार्य करत आहे.

<><><><><>

मध्य प्रदेशातल्या  छिंदवाडा जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी वीज पडून झालेल्या अपघातात चौघा जणांचा मृत्यू झाला असून आठ जण जखमी झाले आहेत. या घटनेतल्या दोन गंभीर जखमींना जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आलं आहे, तर चौघांवर बैहर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बैहर आणि गढी पोलीस ठाण्याच्या हद्दीत या घटना घडल्याची माहिती स्थानिक पोलिसांनी दिली.

<><><><><>

ख्यातनाम तमिळ अभिनेते के. भाग्यराज यांचं आज हृदयविकाराच्या झटक्याने निधन झालं. ते ७३ वर्षांचे होते. आपल्या विनोदी आणि मध्यमवर्गीय पात्रांच्या भूमिकेसाठी ते ओळखले जात. पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी तमिळ चित्रपटांमधे अभिनेता, दिग्दर्शक म्हणून काम केलं. अंदा सात नातकल, मुंदनाई मुदिचू, चिन्ना विदू आणि एंगा चिन्ना रसा हे त्यांचे काही गाजलेले चित्रपट आहेत.

<><><><><>

३ जुलैपासून सुरू होणाऱ्या अमरनाथ यात्रेच्या पार्श्वभूमीवर, सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यासाठी जम्मू-काश्मीर पोलिसांनी 'प्रोजेक्ट हॉक आय' ही आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रणाली सुरू केली आहे. या उपक्रमांतर्गत, तीर्थयात्रेच्या मार्गावर चोवीस तास देखरेख ठेवली जाणार असून  'प्रोजेक्ट हॉक आय' च्या माध्यमातून यात्रा मार्गावर  पाच ड्रोन युनिट्सच्या सहाय्यानं  पाळत ठेवली जाणार आहे.

<><><><><>

इराण आणि अमेरिका यांच्यात युद्धविराम करार झाल्यानंतरही अमेरिकेनं इराणवर हल्ले केले आहेत. होर्मूझच्या सामुद्रधुनीमध्ये एका जहाजावर झालेल्या ड्रोन हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई केल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे. अमेरिकेच्या या हल्ल्याला लवकरच इराणकडून निर्णायक उत्तर मिळेल, असं इराणचे लष्करी प्रवक्ते इब्राहिम अल-फिकर यांनी सांगितलं.

दरम्यान, अमेरिकेनं इराणच्या लक्ष्यांवर लष्करी हल्ले केल्यानंतर काही तासांतच, भविष्यातल्या कोणत्याही आक्रमणाला बळाचा वापर करूनच प्रत्युत्तर दिलं जाईल, असा इशारा अमेरिकेचे उपराष्ट्रपती जेडी व्हान्स यांनी इराणला दिला आहे.

<><><><><>

भारत आणि आयर्लंड यांच्यातल्या टी ट्वेंटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारताला आयर्लंडनं ३४ धावांनी पराभूत केलं. बेलफास्ट इथं काल झालेल्या या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून पहिली गोलंदाजी करायचा निर्णय घेतला. भारतानं आठव्या षटकातच केवळ ५१ धावांत आयर्लंडचे चार गडीही बाद केले. मात्र त्यानंतर लॉर्कन आणि गॅरेथ यांनी केलेल्या फटकेबाजीमुळे आयर्लंडला निर्धारीत २० षटकांत ९ बाद १८२ करता आल्या.

विजयासाठी १८२ धावांचा पाठलाग करताना भारताचे फलंदाज ठराविक अंतरानं बाद होत गेले. सलामीवीर अभिषेक शर्मा वगळता कोणत्याही फलंदाज खेळपट्टीवर टिकू शकला नाही, आणि भारताचा संपूर्ण संघ १८ षटकं आणि ५ चेंडूत केवळ १४८ धावा करून माघारी परतला.

आता मालिकेतला दुसरा आणि अखेरचा सामना उद्या होणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार हा सामना ६ वाजता सुरु होईल.

<><><><><>

एफआयएच प्रो लीग पुरुष हॉकी स्पर्धेत भारतानं पाकिस्तानवर ७-१ ने दणदणीत विजय मिळवला. लंडन इथल्या ली व्हॅली हॉकी अँड सेंटर इथं काल रात्री हा सामना झाला. पहिल्या सत्रात अबु बकरने पेनल्टी कॉर्नरला पाकिस्तानसाठी पहिला गोल डागला. पण दुसऱ्या सत्रात सुखजीत सिंह आणि हरमनप्रीत सिंहने गोल करून सामना पालटला. तिसऱ्या

सत्रात हार्दिक सिंह, जुगराज सिंह, अभिषेक आणि राजकुमार पाल यांनी आणखी चार गोल केले. चौथ्या सत्रात दिलप्रीत सिंहने सातवा गोल केला. उद्या भारताची लढत इंग्लंडशी होणार आहे.

<><><><><>

फिफा विश्वचषक स्पर्धेत इजिप्तनं पहिल्यांदाच नॉकआऊटमध्ये स्थान निश्चित केलं. 'जी' गटसाखळी फेरीतल्या आपल्या अंतिम सामन्यात इजिप्तनं इराणशी १-१ अशी बरोबरी साधली. इराणच्या रामिन रेजेयानची सामनावीर म्हणून निवड झाली. इजिप्तची पुढील लढत राऊंड ऑफ ३२ या फेरीत ऑस्ट्रेलियाशी होणार आहे.

जी गटसाखळीतील आणखी एका सामन्यात बेल्जियमनं न्यूझिलंडचा ५-१ असा पराभव करून गटात अव्वल स्थान पटकावले. या विजयामुळं बेल्जियमची राऊंड ऑफ ३२ मधली जागा निश्चित झाली.

<><><><><>

महाराष्ट्रात कोकण, गोवा, आंध्र प्रदेशाचा किनारपट्टीचा भाग, कर्नाटक, तामिळनाडू, बिहार, छत्तीसगड, पुद्दुचेरी, केरळ, माहे आणि ईशान्य भारतातल्या काही भागांत आज मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

//<><><><><>//